SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429


AKSHARA

Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journ

Vol. 4, Special Issue 02, August 2021

# Dr. Ambedkar in the Global Context



- Guest Editor -

**Dr. Mrs. M.V. Waykole**

Principal,

Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

- Executive Editor -

**Dr. A. D. Goswami**

Vice Principal,

Bhusawal Arts, Science &

P. O. Nahata Commerce College Bhusawal

- Associate Editor -

**Prof. S. P. Zanke**

Professor & Head, Dept. of English,

Bhusawal Arts, Science &

P. O. Nahata Commerce College Bhusawal

Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ

etails Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

*Akshara Multidisciplinary Research Journal*
**Peer-Reviewed & Refereed International Research Journal**

**Volume 4, Special Issue 2**

**August 2021**

# *Dr. Ambedkar in the Global Context*

**Guest Editor**
**Dr. Mrs. M.V. Waykole**
Principal,
Bhusawal Arts, Science & P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Executive Editor**
**Dr. A. D. Goswami**
Vice Principal,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

**Associate Editor**
**Prof. S. P. Zanke**
Professor & Head, Dept. of English,
Bhusawal Arts, Science &
P. O. Nahata Commerce College Bhusawal

*Akshara Publication*
Plot No 143 Professors colony,
Near Biyani School, Jamner Road, Bhusawal Dist Jalgaon (Maharashtra) 425201
Website:www.aimrj.com Email:aimrj18@gmail.com

E- ISSN 2582-54..

# Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

SJIF Imp...

AMRJ

Dr. Ambedkar in the Global Context    Vol. 4, Special Issue 02, August 2021


| Sr.No | Title of the Paper & Author's Name | Pg. |
|---|---|---|
| 25 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार- डॉ. एम. एफ. राऊतराहे | 10 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे आर्थिक विचार-प्रा. डॉ. संजय व्ही. भामरे | 10 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार-प्रा. डॉ. डी. एम. टेकाडे / प्रा.डॉ. यु. एस. पाटील | 10 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार-प्रा. डॉ. रविंद्र पिरन नगराळे | 11 |
| 29 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि शिक्षण- प्रा.डॉ.कांबळे डी.आर. | 11 |
| 30 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर : एक अष्टपैलू व्यक्तिमत्व-डॉ. डी. एम. कदम | 11 |
| 31 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर एक विचारधारा : साहित्य विषयक विचार- प्रा. सुनिल भालेराव पाटील | 12 |
| 32 | खानदेशातील स्त्रियांची आंबेडकरी चळवळ- प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे/अहिरे | 12 |
| 33 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्वसमावेशक विचार प्रणाली-प्रा.डॉ.बी.एस.गायकवाड | 13 |
| 34 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा चळवळीतील दलितेतर सहकाऱ्यावर पडलेला प्रभाव –एक अभ्यास<br>प्रा.रसाळ दशरथ किसन / प्रा.डॉ.विष्णु बब्रुवान वाघमारे | 13 |
| 35 | मार्क्सवादाबद्दल डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे विचार-प्रा. डॉ.वृशाली फुके | 14 |
| 36 | बहिष्कृत भारत च्या अग्रलेखातून प्रतित होणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर-<br>प्रा.रविंद्र गोविंदराव पाटील | 14 |
| 37 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जलधोरण-प्रा. रमेश शंकर माने | 14 |
| 38 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचार -प्रा.डॉ.हिरालाल सोमा पाटील | 15 |
| 39 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्वातंत्र्य व समते संबंधीचे विचार -डॉ.पी.एस .लोखंडे | 15 |
| 40 | डॉ. आंबेडकर यांच्या भाषणातून त्यांच्या चळवळीत सहभागी महिलांचे प्रबोधन-<br>प्रा. यशवंत किसन शिरसाठ | 15 |
| 41 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्रीमुक्ती विषयक विचार-डॉ. दिपाली चंद्रकांत पांडे | 16 |
| 42 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि लोकशाही संकल्पना-प्रा. डॉ. कोनेरू बाबन्नाडूम्मलवाड | 16 |
| 43 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्त्री-सक्षमीकरणामधील योगदान-प्रा. अरूण वसंत अवसरमल | 16 |
| 44 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे कृषि अर्थशास्त्रातील योगदान-डॉ. जयश्री सरोदे- प्रा.शुभम सुरवाडे | 17 |
| 45 | डॉ.आंबेडकरांचे सामाजिक आणि आर्थिक विचार- प्रा.डॉ. दत्तात्रयएम. टेकाडे | 18 |
| 46 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक विचार ( महिलां संदर्भात )-प्रा.के.जे.अनपट | 18 |
| 47 | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची मानव अधिकाराबाबत भूमिका व कार्य : एक ऐतिहासिक चिकित्सा<br>–विकास गवई | 18 |


## हिंदी विभाग


| Sr.No | Title of the Paper & Author's Name | Pg. |
|---|---|---|
| 48 | डॉ. भीमराव अम्बेडकर का चिंतन और सामाजिक न्याय : एक अनुशीलन<br>–डॉ. संतोष कुमार अहिरवार | 1 |
| 49 | अम्बेडकर विचारधारा से प्रभावित उपन्यास : छप्पर- प्रा. डॉ. राजाराम बाबुराव तायडे | 1 |
| 50 | डॉ.बाबासाहब आंबेडकर और हाशिए के समाज का साहित्य<br>- प्रा. हंसा संजय बागरे / डॉ. जिभाऊ शा. मोरे | 1 |

E- ISSN 2582-5429
Akshara Multidisciplinary Research Journal
Peer-Reviewed & Refereed International Research Journal
SJIF Impac
AMRJ
Dr. Ambedkar in the Global Context
Vol. 4, Special Issue 02, August 2021

33

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची सर्वसमावेशक विचार प्रणाली

**प्रा. डॉ.बी.एस.गायकवाड**
मराठी विभाग प्रमुख,
महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा. जि लातूर.
bhilori24@gmail.com संपर्क: ९४०३२५०५४६

**प्रस्तावना:-**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक पातळीवरील असे एकमेव व्यक्तिमत्त्व आहे की, त्यांनी संपूर्ण मानव जातीच कल्याणासाठी, गुलामगिरीच्या जोखडातून त्यांना मुक्त करण्यासाठी,आपलं स्वतांच ज्ञान सर्वच कसोट्यांवर तपासून बघित आणि तमाम जनतेला समतेचं दान आणि भान देण्याचं कार्य केलं.आपल्या ज्ञानाच्या बळावर त्यांनी दिलेल्या राज्यघटनेच दानामुळे गरीब असो, श्रीमंत असो, दलित, शोषित, वंचित, उपेक्षित,पिचलेला माणूस स्वाभिमानाने जगतो आ विद्येबरोबरच शीलाची जोपासनाही केली पाहिजे. असा महत्त्वपूर्ण सल्ला बाबासाहेबांनी दिला होता. ज्ञानाच्या सर्व पातळीवर बाबासाहेबांचे कार्य उजळून दिसते. जातिप्रथेचे निर्मूलन करणारा, सामाजिक जाण डोळ्यासमोर ठेवून समाजक्रां करणारा एक महान समाजशास्त्रज्ञ, दलितांचा उद्धार कर्ता, कामगारांचा मित्र, जातीचा पुरस्कार ज्या लोकांनी केला त्यां बौद्धिक पातळीवर चोख प्रतिउत्तर देणारा विद्वान, लोकशाहीचा रक्षणकर्ता, नव्या शिक्षण पद्धतीचा उद्गाता, एक धर्म प्रवर्तव महान जलनीतीतज्ञ, अशी एक ना अनेक बिरूद ज्यांनी धारण केली ते प्रज्ञासूर्य, बोधिसत्व, महामानव, ज्ञानवंत, प्रतिभावं भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची विचारप्रणाली किती व्यापक, समाज हिताची, लोककल्याणकारी, सर्वसमावेश होती हे या शोधनिबंधाच्या माध्यमातून मांडण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**शोधनिबंधाचे उद्दिष्टे:-** डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय,सामाजिक,आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, कृषी क्षेत्रात जे क केलेले आहे त्यातील त्यांची विचार प्रणाली समजून घेणे. तत्कालीन परिस्थिती व बाबासाहेबांचा विचार यांची आजच परिस्थितीशी तुलना करणे.

**गृहीतके :-** बाबासाहेबांचे विचार जाती-धर्माच्या पिंजऱ्यात अडकवणे योग्य नव्हे. त्यांनी भारतीय लोकशाहीला प्रब करणारा विचार दिलेला आहे. बाबासाहेबांनी दिलेले संविधान हाच भारतीय लोकशाहीचा आत्मा आहे.

एक अलौकिक बुद्धिमत्ता असलेलं व्यक्तिमत्व म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. आपल्या संपूर्ण आयुष्यभर त्यां ज्ञानसाधना केली. राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, इतिहास, धर्मशास्त्र, समाजशास्त्र, कायदा या सर्वच क्षेत्रातील त्यांचा अभ्य अत्यंत चिकित्सक आणि सडेतोड भाषेचा वापर करून झालेला होता. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विच हे फारच व्यापक व मूलगामी आहेत. बाबासाहेबांनी विविध ठिकाणी दिलेली भाषणे, व्याख्याने यातून त्यांचा शिक्षणविषय दृष्टिकोन दिसून येतो. रोग्याला जशी औषधाची गरज असते, तशी अज्ञान व गुलामगिरीच्या व्याधीने ग्रस्त असलेल्य शिक्षणाची गरज आहे. असे ते म्हणायचे. शिक्षण हेच खऱ्या अर्थाने अस्पृश्य, दलित, मागासलेल्या जनतेच्या प्रगतीचे सा आहे. सभ्यता आणि संस्कृती यांचा पाया जर मजबूत करायचा असेल तर शिक्षणाशिवाय पर्याय नाही, असे बाबासाहेब ठाम मत होते. जातीपातीचा समाज मनावर, समाजजीवनावर जो प्रतिकूल/ वाईट परिणाम झालेला आहे, तो जर सकारात्म करायचा असेल तर त्यावर रामबाण उपाय म्हणजे शिक्षण. सर्वांना शिक्षणाची समान संधी मिळाली पाहिजे. मुलांबरोब मुलींनाही शिक्षण मिळावे यासाठी बाबासाहेब आंबेडकर आग्रही होते. उच्च शिक्षणाच्या संदर्भातही त्यांची भूमिका व्याप स्वरूपाची होती. उच्च शिक्षणाची आजची परिस्थिती जर पाहिली तर विद्यार्थी फक्त पदव्या घेऊन बाहेर पडत आहेत. त पिढी राजकारणाच्या विषारी विळख्यात अडकत चालली आहे. वैचारिक आदानप्रदान म्हणावे तसे होताना दिसत नाही. प पाहता ज्ञान प्राप्त करणे हा प्रत्येक विद्यार्थ्यांचा हक्क आहे आणि चांगले ज्ञान मिळविण्यासाठी विद्यार्थ्यांनी झगडले पाहि

कुठेही शेवट नसलेल्या अंतरिक्षाची असीमता आहे. या विचाराला सूर्यासारखे असंख्य डोळे आहेत. आणि या डोळ्यांमध्ये सर्व चराचर सामावलेले आहेत. या विचारांच्या प्रयोगशाळेत प्रत्येक दुःखितांची, प्रत्येकच शोषणाची शहानिशा आहे. आणि दुःखाच्या काळया विवरातून बाहेर पडण्याचा महामार्ग ही यात आहे. या विचाराला इहवादाचे संविधानातील मार्गदर्शक तत्वे, अधिकार, कर्तव्य आणि संविधानाचे प्रिअम्बल या सर्वांची बेरीज म्हणजे डॉ.बाबासाहेब आंबेडकर. आणि बाबासाहेब हे एकूण एक भारतीय नागरिकांच्या उत्थानाचा विचार आहे."७. या सर्व विवेचनावरून शेवटी या निष्कर्षापर्यंत आपण येऊन पोहोचतो की, बाबासाहेबांचा विचार हे सर्वांसाठी आहे. त्यांच्या विचारांना जातीच्या पिंजऱ्यात अडकवू नये. ज्या स्त्रियांना अधिकार नाकारले गेले होते, त्यांना पुरुषांबरोबर समानवेतन, प्रसूतीरजा, यासारखे अधिकार बाबासाहेबांनी प्राप्त करून दिले याची जाणीव आजच्या महिलांना होणे आवश्यक आहे. केवळ अस्पृश्य म्हणून बाबासाहेबांच्या महान विचारांकडे दुर्लक्ष केले गेले. त्याचे परिणाम आज देशाला भोगावे लागत आहेत. तत्कालीन अनेक सामाजिक, राजकीय, शेती संदर्भात, ऊर्जेच्या संदर्भात बाबासाहेबांनी सुचवलेले उपाय दुर्लक्षित केले गेले, त्याचेही परिणाम आज देशाला सहन करावे लागत आहेत.

**संदर्भ ग्रंथ सूची:-**

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर लेखन आणि भाषणे, महाराष्ट्र शासन, खंड १८, भाग-३.
२) दलित साहित्य वेदना व विद्रोह, भालचंद्र फडके, श्रीविद्या प्रकाशन, पुणे.
३) अस्पृश्यांचा मुक्तिसंग्राम, शंकरराव खरात, इंद्रायणी साहित्य प्रकाशन, पुणे, २००४, पृष्ठ-९३.
४) डॉ. यशवंत मनोहर ३२ भाषणे, युगसाक्षी प्रकाशन, नागपुर,२०१२. पृष्ठ-११३.
५) डॉ.बाबासाहेब आंबेडकर, धनंजय कीर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००६. पृष्ठ-१२२.
६) नवे चर्चाविश्व:-दलितेतरांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर, सं.डॉ. दैवत सावंत, गाव प्रकाशन,औरंगाबाद.२०१७. पुष्ठ-३८.
७) नवे चर्चाविश्व:- दलितेतरांसाठी डॉ बाबासाहेब आंबेडकर, सं.डॉ. दैवत सावंत, गाव प्रकाशन, औरंगाबाद. २०१७. मलपुष्ठ.

■ ■ ■